महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४१

# महाराजा सयाजीराव आणि राजा रवी वर्मा

धारा भांड मालुंजकर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४१

# महाराजा सयाजीराव
# आणि
# राजा रवी वर्मा

धारा भांड मालुंजकर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि राजा रवी वर्मा
इतिहास
धारा भांड मालुंजकर
●
प्रकाशन क्रमांक - ६१
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : धारा भांड मालुंजकर
१, निवास ब्लॉसम,
शरणपूर त्र्यंबक लिंक रोड,
कॅनडा कॉर्नर, नाशिक -४२२ ००५
मो. ९८८१७४५६०८
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५४ रुपये

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

| | |
|---|---|
| **दिनेश पाटील** | **बाबा भांड** |
| संपादक | सचिव |
| **महाराजा सयाजीराव** | **महाराजा सयाजीराव गायकवाड** |
| **ज्ञानमाला ई बुक प्रकल्प** | **सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद** |

●●●





# महाराजा सयाजीराव
# आणि
# राजा रवी वर्मा

महाराजा सयाजीराव गायकवाडांनी ललितकलेतील गायन आणि मूर्तिकलेबरोबर चित्रकलेलाही खूप उत्तेजन दिले. चित्रकला ही ललितकलेत प्रमुख कला मानली जाते, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. सयाजीराव महाराज स्वतः प्रज्ञावंत साहित्यिक तसेच सर्जनशील कलाकारांचे पोशिंदे होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणाबरोबर देशी भाषेत साहित्यानिर्मिती आणि ललितकलेची प्रगती यासाठी मोठे योगदान दिले. दाजी नागेश आपटेंनी श्रीसयाजीगौरवग्रंथात, साहित्य आणि ललितकला या लेखात सयाजीरावांचे ललितकलेविषयी असलेले प्रेम आणि आस्था याविषयी सविस्तर लेखन केले आहे. एका सुंदर इंग्रजी कवितेत म्हटल आहे.

***Straight is the line of duty,***
***Curved is the line of beauty.***
***Follow one and then shalt see***
***The other following thee.***

**(William MacCall, Duty)**

*कर्तव्याची मार्गरेषा सरळ असते,*
*तर सौंदर्याची रेषा वक्र असते,*
*पण एकीचा अवलंब केली की,*
*दुसरी आपोआप आपल्या मागे येते.*

'चित्रकला ही मूर्तिकलेची बहीणच' म्हणूनच मूर्तिकलेला राजाश्रय देणाऱ्या महाराजांचे लक्ष चित्रकलेकडेही जाणे अगदी स्वाभाविक आहे. खासकरून महाराज जेव्हा १८८७ ला युरोप प्रवासात तिकडची चित्रमंदिरे पाहून आले तेव्हा त्यांच्यातल्या कलासक्त जाणकाराची अभिरुची अधिक जागृत झाली नाही तर नवल ! आपल्या राज्यात हे सर्व घडावे हे त्यांना वाटणेही स्वाभाविकच होते. महाराजांनी युरोप प्रवासात सर्व प्रसिध्द चित्रमंदिरे खूप बारकाईने पाहिली. अवलोकन केली. या निरीक्षणाच्या दररोज डायरीत नोंदी केल्या. त्या चित्रांबद्दलचे आपले प्रामाणिक पण अभ्यासूवृत्तीने केलेले वर्णन अनेक वेळा त्यांनी पत्रांतून व्यक्त केलेले आहे. अनेक देशाच्या प्रवासातून निरनिराळ्या कालखंडाच्या तेथील संस्कृतीचा अभ्यास महाराजांना चांगल्या प्रकारे झाला होता. वस्तुत: संस्कृतीचा इतिहास म्हणजे सौंदर्य-प्रतीतासाठी मनुष्याने केलेल्या प्रयत्नांचा इतिहास होय..

**History of civilisation is the story of the development of man's conception of what is beautiful and good** असे एक सुभाषित आहे; त्याप्रमाणे युरोपांतील संस्कृतीचा इतिहास



तेथील सिमॅब्यू व गिओतो या तेराव्या शतकातील चित्रकाराच्या कृतींपासून तो आजपर्यंतच्या चित्रसंग्रहांवरून दिसून येतो. हिंदुस्थानातल्या ऐतिहासिक चित्रांना एकत्र व्यवस्थित नीट न जतन केल्याने असा चित्रसंग्रह आपल्याकडे सापडत नाही. आपल्या ऐतिहासिक कला वैभवांनी निरनिराळ्या राजवटीचे अनुभव घेतले. ज्यांनी हिंदुस्थानावर राज्य केले त्या त्या वेळेस हा कलेचा सांस्कृतिक ठेवा आपपसातल्या हेव्यादाव्यांचा शिकार बनला. या सांस्कृतिक ठेव्याने खूप आघात सोसले. इतिहासात एकेकाळी सन्मानाने मिरविलेल्या वास्तूंनी मूर्तिभंजकांच्या हातोड्यांचे घाव सोसले. तसेच वेडेपणांनी विस्तवाच्या मशालींनी या वैभवाची राखरांगोळी केली. त्यामुळे तो इतिहास आपल्याला पूर्ण समजणे तसे अवघडच आहे. याचीच जाणीव महाराजांना चांगली झाली होती.

एका कवीने म्हटले आहे की,

***All passes, art alone Enduring Stays to us ;***
***The bust out-Lasts the throne;***

**(The Coin, Tiberius).**

जगातील सर्व वस्तू नष्ट झाल्या, तरी कला मात्र शिल्लक राहते., राजांची सिंहासने नष्ट झाली, तरी त्यांच्या पुतळ्यांवरून व नाण्यांवरून मागील इतिहास जुळविता येतो.

परंतु जंगली लुटारूंच्या दांडगाईने हे कलेचे नमुनेही नाहीसे झाले, तर इतिहासाची जुळणी करणे अर्थातच जास्त कठीण होते. तथापि कधी-कधी तो गत इतिहास आपण होऊन आपले डोके



वर काढतो. अलीकडील सिंध व पंजाब येथील उत्खननांवरून हिंदुस्थानचा पाच हजार वर्षांपूर्वीचा इतिहासाच समोर आला. त्यात सापडलेली चित्रे, मूर्ती वगैरेंवरून, तसेच अजिंठा, वेरूळ वगैरे ठिकाणच्या चित्रांवरून प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाचे दुवे जुळवावे लागतात. ३००० वर्षापूर्वीचे मोहोंजदडे आणि हडप्पा येथील चित्रे, मूर्ती, पुतळे वगैरे अजून अस्तित्वात असून, ती आता सापडल्याने त्यांच्या आधारानेच मागील इतिहासाचा मागोवा घेणे शक्य होत असते. हे सर्व लक्षात आल्याने महाराजांनी आपल्या राज्यात एक मोठा कलासंग्रह निर्माण करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी युरोपातून स्पीलमन् नावाच्या तज्ज्ञास भारतात आणले. त्याच्या मदतीने युरोपातील उत्कृष्ट कलावंतांची चित्रे खरेदी करून त्यांनी बडेद्यात आणली.

## आणि विविध ललितकलांना उत्तेजन दिले.

राज्यकारभार सांभाळताना महाराजांना अनेक वेगवेगळ्या भूमिकांमधून जावे लागत असे. एकीकडे शिस्तीचे सुप्रशासन तर दुसरीकडे साहित्य, संस्कृती आणि कलेबद्दलची अभिरुची ! राज्यकारभाराचे काम हे व्यावहारिक दृष्टीने सरळ रेषेत चालणारे असते, तर चित्रकलेच्या वक्र रेषांत साठवलेल्या सौंदर्याची अनुभूती घेण्यास त्याच्याकडे मुद्दाम वळून पाहावे लागते. जे वर दिलेल्या इंग्रजी कवितेतून फार सुंदरपणे व्यक्त केले गेले आहे. प्रजेची उन्नती सांस्कृतिकदृष्ट्या करून प्रजेची कलेतली अभिरुची वाढविण्यासाठी आणि अवलोकनार्थ राज्यातील



चित्रकला हे माध्यम वापरणे हे ललितकला सुधारणा धोरण महाराजांनी अवलंबविले होते. युरोपियन मूर्तिकार 'फेलेसी' हा एक उत्तम चित्रकारही होता. महाराजांनी त्याच्याकडून काही उत्तम पेंटिंग करवून घेतलेल्या आहेत. त्यात लक्ष्मीविलास राजवाड्याच्या मुख्य जिन्यावर लावलेले एका महाराणीचे पेंटिंग फारच सुंदर बनविले आहे. चांगले कपडे घातल्यामुळे तिचे मूळचे सौंदर्य फारच खुलून दिसते. हे पेंटिंग १८९७ साली केलेले आहे. परंतु बडोद्यातला त्या काळचा सर्वोत्कृष्ट चित्रसंग्रह म्हणजे भारतीय चित्रकारांचे मुकुटमणी राजा रवी वर्मा यांच्याकडून महाराजांनी करवून घेतलेले तैलचित्रे आहेत. त्यासाठी महाराजांनी राजा रवी वर्मांना राजाश्रय देऊन राजसन्मानाने ठेऊन घेतले होते. त्यांच्यासाठी प्रशस्त हवेली बांधली होती आणि त्यात चित्रकारीसाठी एक स्टुडिओ उभारला होता.

## राजा रवी वर्मा आणि बडोदा संबंध

आज आपण जेव्हा डोळे मिटून 'या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।' ही सरस्वती वंदना म्हणतो तेव्हा डोळ्यांसमोर शुभ्र वस्त्रातली वीणा पकडलेली सरस्वती येते. ती म्हणजे सर्वांना माहीत असलेली भारतीय चित्रकार राजा रवी वर्मा यांनी चितारलेली सरस्वती ! फक्त सरस्वतीच नाही, तर सर्व हिंदू देवतांना आपल्या विलक्षण प्रतिभेने मानवी रूपात साकारणारे चित्रकार म्हणजे राजा रवी वर्मा. ते असे चित्रकार होते ज्यांनी पहिल्यांदा हिंदू देवी देवतांना सामान्य माणसांसारखं दाखवलं.



बडोदा राजाश्रयानंतर राजा रवी वर्मांना चित्रकला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची प्रबळ इच्छा झाली होती. राजा रवी वर्मा यांचा जन्म केरळमधील किलीमानूर नामक गावात २९ एप्रिल १८४८ मध्ये झाला. त्यांचे काका तंजावर शैलीचे चित्रकार, आई उमा अंबाबाई तंपुराटटी एक सिद्ध कवयित्री होती, तर वडील एजिमाविल भट्टतिरिप्पाट हे संस्कृतचे विद्वान होते. आज राजा रवी वर्मा ( १८४८-१९०६ ) हे जगप्रसिध्द चित्रकारांपैकी एक आहेत. भारतातील प्रथम लिथोप्रेस सुरू करणाऱ्या राजा रवी वर्मांचा इतिहास बघितला तर असे लक्षात येते की, बडोद्याचा राजाश्रय आणि सर टी. माधवराव यांच्या मदतीमुळे राजा रवी वर्मांच्या सुवर्ण कारकीर्दीत व नावलौकिकात मोलाचा वाटा आहे. या दोघांच्या सढळ मदतीने राजा रवी वर्मा बडोदा संस्थानात नव्हे तर जगभरातल्या चित्रकलेच्या प्रांगणात प्रसिध्दी पावले.

पुण्यात एक चित्र प्रदर्शन भरले होते. त्या प्रदर्शनात टी.माधवरावांनी राजा रवी वर्माचं 'नायर' स्त्रीचे तैलचित्र पण ठेवले होते. एक दिवस राजा रवी वर्मांना एक तार आली, "पुण्याच्या प्रदर्शनात ठेवलेल्या आपल्या नायर स्त्रीच्या चित्राला बडोदा महाराजांचं सुवर्णपदक मिळाले आहे." टी. माधवरावांचा आणि राजा रवी वर्माचा खूप जुना स्नेह होता. त्रिवेंद्रमच्या त्रावणकोरच्या राजघराण्यात राजे आईल्यम तिरूनाल यांच्याकडे दिवाण आणि त्यांचे बंधू युवराज विक्रम यांच्यासाठी


ravivarma.org

पालक म्हणून टी. माधवरावांची नेमणूक केली होती. राजा रवी वर्मांनी चित्रकलेचे खरे धडे याच राजघराण्यात घेतले होते. राजे आईल्यम खूप उदार व कलावंत मनाचे राजे होते. त्यांनी राजा रवी वर्माला त्यांची चित्रकला बहरण्यासाठी राजदरबारात ठेवून घेतले होते. रवी वर्मा वीस वर्षाचे असताना इंग्रज चित्रकार थीओडोर जॉन्सन यांना १८६८ मध्ये त्रिवेंद्रमच्या राजवाड्यात आमंत्रित केले होते. जॉन्सन व राजदरबारचे चित्रकार रामस्वामी नायडू या दोघांच्या चित्रांचा रवी वर्मा यांच्यावर प्रभाव पडला. थीओडोर जॉन्सन यांनी हाताळलेले तैलरंग हे माध्यम त्या काळी भारतीय कलापरंपरेला नवीनच होते. तरुण रवी वर्मांच्या पुढे या माध्यमामुळे एक नवीन विश्वच उभे राहिले. मोठ्या उत्साहाने त्यांनी हे माध्यम आत्मसात करून, त्यात विलक्षण प्रभुत्व संपादन केले. परदेशी चित्रकार तैलरंगाचे चित्रे बनवत असत. तिपाईवर कॅन्व्हास ठेवून ते चित्र रेखाटत असत. त्यांचा कॅन्व्हास हा ज्यूटचा असे. भारतात ही पद्धत कुणालाही ठाऊक नव्हती. राजा रवी वर्मा यांनी पहिल्यांदा ही पद्धत शिकली आणि भारतात तिचा प्रसार केला. चित्रकार थिओडोर जॉन्सन यांच्याकडूनच रवी वर्मा यांनी पोर्ट्रेट बनवण्याची कलाही शिकली.

त्यामुळे टी. माधवरावांना राजा रवी वर्मांची चित्रकार म्हणून कारकीर्द चांगली ठाऊक होती. इ.स. १९०४ मध्ये, भारताचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी राजा रवी वर्माला ‘केसर-इ-हिंद’ या सुवर्णपदकाने सन्मानित केले. त्यावेळेस त्याचे नाव

'राजा रवी वर्मा' असे नोंदविले गेले. राजे आईल्यम तिरूनाल निवर्तल्यावर दिवाण टी. माधवरावांनी त्रावणकोर राज्यघराणे सोडले. ते नंतर बडोद्याचे दिवाण झाले. त्यावेळेस महाराज सयाजीराव गायकवाड खूप लहान होते आणि टी. माधवरावांच्या नेतृत्वाखाली राज्यकारभाराचे धडे शिकत होते.

टी. माधवरावांनी बडोद्याच्या दरबारासाठी राजा रवी वर्मा यांचे ‘सीताभूमिप्रवेश’ हे चित्र खरेदी केले होते.

ते चित्र घ्यायला आले तेव्हा त्यांना राजा रवी वर्मांनी बनविलेल्या नायर स्त्रीचे चित्र खूप आवडले होते. योगायोग असा



की त्याच वेळी राजा रवी वर्मांनी टी. माधवरावांना ते चित्र भेट म्हणून देऊन टाकले आणि हेच चित्र टी. माधवरावांनी पुण्याच्या प्रदर्शनात पाठवले होते. या चित्राने त्यांना खूप प्रसिध्दी मिळवून दिली होती. राजा रवी वर्माने त्या चित्राच्या दोन प्रतिकृती करून ठेवल्या होत्या. ते चित्र एका 'कामिनी' नावाच्या सुंदर नाजूक मुलीचे तैलचित्र होते.

## राजा रवी वर्मास १८८१ ला महाराजांच्या राज्याभिषेकाचे आमंत्रण

१८८१ ला टी. माधवराव राजा रवी वर्मा आणि राज वर्मा या दोघा भावांना बडोद्याच्या राज्याभिषेकाचे अगत्याचे आमंत्रण देण्यासाठी जातीने त्यांच्याकडे गेले. जाताना ते राजा रवी वर्मांनी प्रदर्शनात प्रथम पारितोषिक मिळालेले सुवर्णपदक घेऊन गेले. यापूर्वी राजा रवी वर्माला बरीच पारितोषिक मिळाली होती. परंतु बडोद्याचे दिवाण या नात्याने त्यांनी ते सुवर्णपदक स्व:त: राजा रवी वर्मास प्रदान करणे उचित समजले. राजा रवी वर्मानेही ते पदक आदराने मस्तकी लावून स्वीकारले. प्रदर्शनात हे चित्र मुंबईचे त्या वेळेचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांना खूप आवडले आणि त्यांनी त्याची मागणी केली. ही गोष्ट टी. माधवरावांनी जेव्हा राजा रवी वर्माला सांगितली त्यावेळी दुसरी प्रतिकृती असलेले चित्र त्यांनी टी. माधवरावांना देऊन टाकले. त्याची किंमत म्हणून बदल्यात "माझ्यावर असेच अखंड प्रेम करत राहा" हे मागितले.

टी. माधवरावांच्या विनंतीस मान देऊन २८ डिसेंबर १८८१ ला राजा रवी वर्मा राज वर्मासह बडोद्याला गेले. कुमारावस्थेतील सयाजीराव महाराजांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या थाटात जल्लोशात पार पडला. या सोहळ्यासाठी अनेक राजे आमंत्रित केले होते. दरबारात सर्व राजे आणि मानकरी जमा झाले होते. सर रिचर्ड मीड रेसिडेंटसाहेबांनी सयाजीराव महाराजांना मखमली सिंहासनावर नेऊन बसवले आणि सयाजीराव महाराज अधिकृतरीत्या राजे झाल्याची घोषणा केली. तोफांची सलामी झाली आणि बडोद्यात एकच आनंदोत्सव झाला. त्यावेळी महाराज १८ वर्षांचे तर राजा रवी वर्मा ३३ वर्षांचे होते. तो सोहळा पाहून राजा रवी वर्मांनी महाराजांचा आणि टी. माधवरावांचा निरोप घेतला. ते मुंबईला परत यायला निघाले. बडोदा स्टेशनवर त्यांना निरोप द्यायला टी. माधवराव स्वत: आले होते. त्यावेळेस राजा रवी वर्मा म्हणाले, “वयानं लहान आणि अजाण असले तरी सयाजीराव महाराजांपुढं नतमस्तक होताना जो निर्भेळ आनंद मला लाभला, तो इतर राजांपुढे लाभेल की नाही याची मला दाट शंका आहे.” बडोद्याहून राजा रवी वर्मा एक वेगळाच अनुभव घेऊन आले होते. ते सर्वांना सांगत होते की, “तो कुमार राजा, पण त्याचं तेज वय विसरायला लावतं. आयुष्यात एक अनमोल स्नेहबंध घेऊन आल्याचा आनंद मी उपभोगत आहे.”

## लक्ष्मीविलास दरबार हॉलच्या चित्रांसाठी रवी वर्मांची निवड

१८८८ ला एकदा महाराजा सयाजीराव उटकमंडला (आताचे उटी) टी.माधवरावांबरोबर फिरायला बाहेर पडले होते. ते दोघे एकटेच होते. सोबत कुणीही सेवक नव्हते. त्यावेळेस टी. माधवराव बडोद्याच्या दिवाणगिरीतून सेवानिवृत्त झालेले होते. पण महाराजांचे हे वैशिष्ट्य होते की, ते व्यवहार आणि मैत्री या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या जागी ठेवत असत. टी. माधवरावंबरोबरची त्यांची मैत्री पहिल्यासारखीच टिकून होती. महाराज बडोद्याच्या एकूण सर्व राज्यकारभाराविषयी त्यांच्याशी मनसोक्त गप्पा मारत असत. बडोद्यात काय काय सुधारणा होत आहेत त्याविषयी टी. माधवरावांना सांगत असत. त्यावेळी लक्ष्मीविलास पॅलेसचे बांधकाम पूर्ण होत आले होते. पॅलेसच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी त्यांनी पाश्चात्त्य देशांतून पुष्कळ ब्रॉंझचे पुतळे आणले होते. काही तैलचित्रही आणले होते; पण महाराजांना दरबार हॉलमध्ये भारतीय संस्कृती अधोरेखित करणारी चित्रकला अपेक्षित होती. रामायण-महाभारत हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत. त्यामुळे ही संस्कृती जाणणाऱ्या कलाकाराचा शोध ते घेत होते. युरोपात त्यांनी अशी मोठमोठाली भित्तिचित्रे आणि छतं चित्तारलेली पाहिली होती. दरबार हॉलसाठी पाश्चात्य चित्रकाराला ते सहज नेमू शकत होते. परंतु भारतीय संस्कृतीचा जाण असलेला कलाकार हे काम अधिक

आत्मीयतेने करू शकेल असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी टी. माधवरावांकडे असा कोणी कलाकार आहे का? म्हणून चौकशी केली आणि काहीही वेळ न घालवता त्यांनी सुचविले. असा एकच योग्य चित्रकार आहे आणि तो म्हणजे “ राजा रवी वर्मा”. टी. माधवरावांच्या वाक्यावर शिक्कामोर्तब करत सयाजीरावांनी राजा रवी वर्माकडून हे काम करून घ्यायचे ठरविले. टी. माधवरावांनी याआधी राजा रवी वर्माकडून राजघराण्यातले चार तैलचित्रे काढून घेतली होती. तसेच मोतीबागेतल्या दरबारासाठी पौराणिक चार चित्रे काढून घेतली होती.

राजा रवी वर्मांना बडोद्यात बोलावण्यासाठी महाराजांनी स्वत: त्याच्याकडे जायचे ठरविले; परंतु बडोद्याचे महाराज या नात्यानं त्यांना राजा रवी वर्माच्या राज्यात म्हणजे त्रिवेंद्रमला जाणे म्हणजे इंग्रज राजसत्तेची परवानगी घ्यावी लागणार होती. शिवाय सर्व गोष्टी करण्यासाठी बराच वेळ लागू शकणार होता. म्हणून टी. माधवरावांनी राजा रवी वर्मालाच उटकमंडला महाराजांच्या भेटीस बोलावण्याची व्यवस्था केली. टी. माधवरावांनी राजा रवी वर्माला स्वत: पत्र लिहून महाराजांना भेटण्यासाठी उटकमंडला येण्याची विनंती केली.

राजा रवी वर्मा टी. माधवरावाच्या विनंतीस मान देऊन लगेच उटकमंडला आले. टी. माधवरांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या निवासाची व्यवस्था आपल्याच निवासस्थानी केली. तातडीनं बोलावण्याचे कारण जाणून घेण्यास राजा रवी वर्मा

उत्सुक होते, पण हे कारण त्यांनी महाराजांच्याच तोंडून ऐकावे असे टी. माधवरावांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी सायंकाळी महाराजांना भेटण्याची वेळ निश्चित केली. त्यावेळेस टी. माधवराव राजा रवी वर्मा यांना म्हणाले, “ मी एवढच सांगतो की मी जरी बडोद्याच्या सेवेतून निवृत्त झालो आहे; वयानं मोठा असलो, तरी हा राजा जुने संबंध विसरत नाही. या राजाच्या सहवासात आलेली माणसं त्यालाही कधी विसरू शकत नाही. असं ते वेगळं व्यक्तिमत्त्व आहे. राजाजी, हा राजा अतिशय वक्तशीर आहे. संध्याकाळची पाचची वेळ त्यांनी दिली आहे. त्याआधी आपण तयार असावे, ही विनंती.”

बरोबर साडेचार वाजता रवी वर्मा आणि राज वर्मा दिवाणखान्यात आले. तेव्हा माधवराव त्यांच्या आधीच तेथे हजर होऊन त्यांची वाट बघत बसले होते. महाराजाच्या सचिवांनी तिघांचे स्वागत केले आणि बरोबर पाच वाजता सयाजीराव महालात आले. त्यांनी डोक्यावर गुजराथी पगडी, अंगात रेशमी शेरवानी, पायात चुडीदार विजार आणि राजपुती मोजडी घातलेली होती. बडोद्याचे महाराजा असूनही गळ्यात फक्त एक मोत्याची माळ सोडून एकही राजभूषण त्यांच्या अंगावर नव्हतं. त्यांच्या कपाळी गंधाचा टिळा होता. आपल्या विशाल डोळ्यांनी ते सर्वांना निरखून पाहत होते. रवी वर्मांना पाहताच, ते अगत्यानं पुढे आले. राजा रवी वर्माचा हात आपल्या हातात घेत म्हणाले, “राजेसाहेब आपल्याला भेटायची खूप इच्छा होती, आम्ही

स्वत: आपल्याला भेटायला आलो असतो; पण ते शक्य झालं नसल्याने, आपल्याला इथे यायचा त्रास झाला.” महाराजांची नम्रता आणि सौजन्य पाहून राजा रवी वर्मा गहिवरून गेले.

राजा रवी वर्माची आणि महाराजांची ही दुसरी भेट होती. उटकमंड थंड हवेचे ठिकाण, त्यामुळे बाहेर मोकळया हवेत फिरत फिरत या सगळ्यांच्या गप्पा चालल्या होत्या. महाराजांनी राजा रवी वर्माला भेटीचे कारण सांगितले. महाराजांच्या राज्यरोहणाच्या दिवशी राजा रवी वर्मा महाराजांना भेटले होते. त्या घटनेला सात-आठ वर्षे झाली होती. त्यानंतर महाराजांनी बडोद्यात बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. त्यासंबंधी महाराजांनी राजा रवी वर्माला बोलता बोलता माहिती दिली. त्यातच लक्ष्मीविलास पॅलेसचे बांधकामही संपत आले होते. राजवाड्याचा दरबार हॉल सजवण्यासाठी त्यांना राजा रवी वर्मांकडून काही तैलचित्र तयार करून हवी होती. त्यात भारतीय संस्कृतीचं दर्शन घडवणाऱ्या रामायण, महाभारत, पुराणं यांतील कथांवर आणि प्रसंगावर आधारलेली चित्रे त्यांना अपेक्षित होती. ती चित्रं राजा रवी वर्मांनी करावीत अशी इच्छा महाराजांनी बोलून दाखवली आणि त्यासाठी तुम्हाला इथवर येण्याचा त्रास दिला, अशी महाराजांनी दिलगिरीही व्यक्त केली. एवढ्या मोठ्या संस्थानाचा महाराजा; परंतु अत्यंत शालीन आणि नम्र हे पाहून टी. माधवरावांनी महाराजांच्या स्वभावाचे केलेले वर्णन राजा रवी वर्मा अनुभवत होते.

## राजा रवी वर्माची दरबार हॉलच्या चित्रांसाठी भारतभर भ्रमंती

दरबारहॉलसाठी कमीत कमी बारा ते चौदा तैलचित्रे लागण्याची शक्यता टी. माधवरावांनी वर्तवली. बारा-चौदा चित्रे तयार करायला बराच अवधी लागणार होता. त्यात परत राजा रवी वर्मांना हे काम करण्यासाठी भारतभर फिरून, अभ्यास करून, चित्र काढावी लागणार होती. त्यामुळे भरपूर वेळ घेणारं हे काम होतं. राजा रवी वर्मांना हे कळत होतं की, या कामात देशभर खूप भटकंती करावी लागणार आहे. त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता पाहून महाराज म्हणाले, “मी नुकताच परदेशातून फिरून आलो आहे. तिथले राजवाडे, तिथली चित्रांनी सजविलेली सभागृहं मी पाहिली आहेत. तुम्हाला हवा तेवढा वेळ घ्या; पण ही चित्रे तुम्हीच पुरी करावी, अशी आमची इच्छा आहे. देशभर फिरण्याची मुळीच चिंता करू नका. त्यासाठी आपल्याला जो खर्च लागेल, तो आमच्या दरबारातून दिला जाईल.” त्यावर थोडे कठोर होत राजा रवी वर्मा म्हणाले, “महाराज, त्याची काही आवश्यकता नाही. तो माझा अभ्यासाचा विषय आहे. त्याचा खर्च मी आनंदाने करेन.” सयाजीराव एकदम पुढे झाले आणि राजा रवी वर्माच्या खांद्यावर हात ठेवून, अतिशय नम्रपणे म्हणाले, “माफ करा, आपण राजे आहात. हे आम्ही विसरलो होतो. पुन्हा आमच्या हातून अशी चूक होणार नाही” महाराजांच्या मोठेपणाचा आणि नम्रतेचा अनुभव घेऊन राजा रवी वर्मा बंधू राज वर्मास घेऊन आपल्या

किलीमानूर गावी आले. सयाजीराव महाराजांनी टाकलेली जबाबदारी खूप मोठी होती. त्याची जाणीव रवी वर्मांना होती. त्याकामासाठी उत्तर प्रदेश, देशातली सर्व धर्मस्थळं, अयोध्या, मथुरा, तक्षशिला ही ऐतिहासिक आणि धार्मिक ठिकाणं एकदा नजरेखालून घालण्याचे राजा रवी वर्मांनी ठरविले. दोघे भाऊ भारतभर फिरले. तीन-चार महिने प्रवास करून ते किलीमानूरला परतले. राजा रवी वर्मांना हवा असलेला अभ्यास या प्रवासात झाला नाही. त्यांना जे हव होतं, तसा तो परिसर आता राहिलेला नव्हता. त्यामुळे ते निराश झाले. त्यांचे चित्रकार काका राज वर्मांनी त्यांना कलाकारानं कसे चित्र काढावे, काय गोष्टी टाळाव्यात हे समजून सांगितलं, "रामायण, महाभारत तू तुझ्या कल्पनेतून साकार. तुझी कल्पकता हीच चित्रकाराची खरी ओळख आहे,." असे मामांनी समजावल्यावर राजा रवी वर्मांनी बडोदा दरबाराच्या कामाला सुरवात केली.


१८८८ ते १८९० या दोन वर्षात राजा रवी वर्मांनी या कामाला स्वत:ला झोकून दिलं. पौराणिक कथेतले एक एक चित्र पूर्ण करत चौदा चित्रे पूर्ण झाली. त्यासाठी त्यांनी व्यास-वाल्मीकी, नल-दमयंती, अर्जुन-सुभद्रा, द्रौपदीवस्त्रहरण, हरिश्चंद्र-तारामती, सीतास्वयंवर, देवकी-कृष्ण, असे अनेक विषय निवडले होते. ही चित्रं पूर्ण झाली तेव्हा त्या कलाकृतींची त्रिवेंद्रममध्ये खूप चर्चा झाली. त्रिवेंद्रमचे महाराज आणि बडोद्याचे महाराज यांच्या परवानगीने त्या चित्रांचं प्रदर्शन प्रथम त्रिवेंद्रममध्ये भरविले गेले.

या प्रदर्शनाला शेकडो लोकांची गर्दी झाली होती. येणाऱ्या लोकांनी देवांची चित्रे म्हणून भाविकपणे चित्रांसमोर डोके टेकवून नमस्कार केले. त्रिवेंद्रमनंतर राजा रवी वर्मा मुंबईला आले. महाराजा सयाजीरावांच्या परवानगीने त्यांनी मुंबईत त्या चित्रांचं प्रदर्शन भरविलं. मुंबईत हजारो लोकांनी ही चित्रं पाहिली आणि त्या चित्रांचे काढलेले फोटो भारतभर वाटले गेले. आता ज्यांच्यासाठी ही चित्रे रेखाटली होती त्यांना देण्याची वेळ आली होती. चित्रे घेऊन राजा रवी वर्मा बंधू राज वर्मासह बडोद्याला गेले.

## राजा रवी वर्माचे बडोदा वास्तव्य

बडोद्याच्या रेल्वेस्थानकावर त्यांच्या स्वागतासाठी सयाजीराव महाराजांचे खास सचिव आणि सेवकवर्ग हजर होता. राजा रवी वर्मांचे सर्व चित्रासह बडोद्यात आगमन झाले. महाराज काही कामासाठी नवसारीला गेले होते आणि दोन दिवसात परत येणार होते. त्यादरम्यान राजा रवी वर्मा आणि बंधू राज वर्माची जबाबदारी खास सचिवांकडे सोपवली होती. त्यानुसार या दोघांची राहण्याची व्यवस्था नवीन बांधलेल्या लक्ष्मीविलास पॅलेसच्या आवारात असलेल्या एका हवेलीत करण्यात आली होती. राजा रवी वर्मांनी हवेलीत आल्यावर त्रिवेंद्रमहून आणलेल्या चित्रांवर काही सुधारणा करायला सुरुवात केली. दोन दिवसांनंतर महाराज नवसारीहून परत आले.

महाराजांची सर्व चित्रे पाहण्याची उत्सुकता वाढत होती. आल्या आल्या राजा रवी वर्मांची भेट घेऊन त्यांनी संपूर्ण राजवाडा राजा रवी वर्मांना फिरवून दाखविला. ज्या दरबारात चित्रे लावायची होती, तो दरबारहॉलही दाखविला. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ



वाजता राजा रवी वर्माच्या हवेलीत जाऊन चित्रे बघायचे ठरले. दरबारहॉलमध्ये कोणती चित्रे कुठे लावायची, याचे स्वातंत्र्यही राजा रवी वर्मांना देण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर नऊ वाजता एकटे महाराज राजा रवी वर्माच्या हवेलीच्या दारात उभे होते. चित्रे पाहायची उत्सुकता वाढली होती. एकीकडे खुद्द महाराज हवेलीत आल्याने राजा रवी वर्मा आणि राज वर्माला महाराजांचे स्वागत कसे करावे

हे कळत नव्हते. दोघा बंधूंना नाराज न करण्याकरीता महाराजांनी फक्त बिनादुधाची काळी कॉफी घेऊन पाहुणचार लवकरच गुंडाळला आणि ज्या महाली ( studio) चित्रे ठेवली होती तिथे सगळे गेले. महाराज एक एक चित्र मोठ्या नवलाईने पाहत होते. सर्वच पौराणिक चित्रे त्यांचं लक्ष वेधून घेत होती. साऱ्या महालात प्रचंड शांतता होती. सारी चित्रे बघून महाराज राजा रवी वर्मांकडे वळले. ते सुध्दा महाराजांच्या प्रतिक्रियेच्या प्रतीक्षेत उभे होते. त्यांनी महाराजांना न राहून विचारलं, “महाराज, चित्रं आवडली?” त्या प्रश्नानं चित्रांच्या विचारत हरवलेले महाराज भानावर आले. रवी वर्मांकडे नजर रोखत ते म्हणाले, “ राजे, माझ्याकडे आवडली, सांगण्यासाठी शब्द नाहीत. मी पाश्चात्य देशात जाऊन आलो. अनेक चित्रशाळा पाहिल्या. बायबल आणि ग्रीक पुराणकथा यांवर आधारलेली आणि श्रेष्ठ युरोपियन चित्रकारांनी चितारलेली प्रार्थना मंदिरं मी पाहिली आहेत. इथं आल्यावर माझं स्वप्न हेच होतं की आपल्या भारतीय संस्कृतीची प्रतीकं असलेली हे पौराणिक कथांचे प्रसंग चित्रांच्या माध्यमातून साकारावेत आणि हे रामायण महाभारतातले प्रसंग परदेशातल्या चित्रकारांप्रमाणे त्याच जिद्दीने कोणी करेल का? या माझ्या प्रश्नाचे उत्तर माधवरावांनी दिले. आपण ते काम करून माझे स्वप्न पूर्ण केले. माधवराव आठ महिन्यांपूर्वीच स्वर्गवासी झाले. आज असते तर माझ्यापेक्षा त्यांना जास्त आनंद झाला असता.”

दरबारहॉलमध्ये ही चित्र कुठे व कशी लावावीत हे ठरवायला राजा रवी वर्मा यांना सांगितले होते. पण त्याआधी या चित्रांचे बडोद्यात प्रदर्शन करावे, अशी विनंती राजा रवी वर्मा यांनी महाराजांना केली. महाराजांना ही कल्पना खूप आवडली. दरबारात एकदा ही चित्रे लावली गेली की आम जनतेला सर्व चित्रं बघण्याचा आनंद आणि संधी मिळणार नाही, या विचाराने महाराजांनी या प्रदर्शनास परवानगी दिली कारण मुंबईत या चित्रांनी सर्वांच्या मनात घर केले होते. काढलेल्या चित्रांच्या फोटांची विक्री मोठ्या प्रमाणावर बरेच दिवस चालू होती. त्यावरून ही चित्रे रंगीत छायाचित्रात करून विकण्याची कल्पनाही महाराजांनी राजा रवी वर्मा यांना तेव्हा दिली. काळाच्यापुढे दूरदृष्टी असणाऱ्या महाराजांचा व्यावसायिक दृष्टिकोन वाखाणाण्याजोगा होता. यावर राजा रवी वर्मा महाराजांना म्हणाले होते, “महाराज चित्र काढणे एवढं मी जाणतो. पण त्याची छपाई, त्याचा प्रसार हे मी जाणत नाही.”

त्यावर महाराजांनी फार मार्मिक उत्तर दिले होते, “राजाजी, काही गोष्टी उपजतच येतात. काही गोष्टी शिकाव्या लागतात. शिकल्याने साऱ्या गोष्टी येतात.”

त्या कृष्णधवल चित्रांना एवढी प्रसिध्दी मिळाली होती की, या चित्रांचा एक संच महाराजांपर्यंतही पोहोचला होता. महाराजांना आनंद या गोष्टींचा झाला होता की, आपल्या भारतीयांना चित्र

पाहायची सवय लागत आहे. आपल्या लोकांमध्ये चित्रकलेबद्दल अभिरुची निर्माण होण्यासाठी आपल्या दरबारातील चित्रांची रंगीत छायाचित्रे काढून त्याच्या प्रति केल्या तर त्यांना आनंदच होणार होता. ही चित्र मूळ रंगात, नाना आकारात करून लोकांच्या घराघरांत पोहोचतील आणि लोकांना चित्र पाहण्याची एक दृष्टी मिळेल ही महाराजांची इच्छा होती आणि हीच गोष्ट खूप आधीच दिवाण टी. माधवरावांनी राजा रवी वर्माला सांगितली होती.

महाराज इंग्लंडला गेले तेव्हा तिथले चित्रसंग्रहालय पाहून खिन्न झाले होते. लंडनची नॅशनल गॅलरी ही उत्कृष्ट चित्रांचा संग्रह असलेली पिक्चर गॅलरी आहे. पण तो संग्रह ठेवला आहे ती इमारत खूपच खराब आहे. महाराजांचे कलासक्त मन यामुळे जागृत झाले होते. सुंदर कलाकृतींना ठेवायची जागाही सुंदरच असायला हवी या विचाराने त्यांनी पुढे बडोद्यात चित्रसंग्रहाकरिता बऱ्याच सुधारणा केल्या.

काही दिवसांत राजा रवी वर्माच्या चित्रांचं प्रदर्शन बडोद्याच्या उद्यानामध्ये असलेल्या महालात भरवलं गेलं. चित्रप्रदर्शन पाहण्यासाठी किती माणसं आली होती हे मोजण्यासाठी चित्रप्रदर्शनाच्या प्रवेशद्वारात एक खड्यांनी भरलेला छोटा रांजण ठेवला होता. त्याच्या बाजूला रिकामा रांजण ठेवला होता. चित्र पाहून जाणाऱ्यांनी फक्त एक खडा उचलून रिकाम्या रांजणात टाकायचा होता. पहिल्या दिवशी प्रदर्शन संपल्यावर रांजणात सहाशे खडे होते. हे पाहून राजा रवी वर्मा आणि महाराज या

दोघांनाही खूप आनंद झाला; पण त्याहून थक्क करणारी गोष्ट म्हणजे लोक चित्रांचे डोकं टेकवून दर्शन घेत होते, चित्रांपुढे पैसे ठेवत होते. मंदिरात आल्याप्रमाणे त्यांचे वर्तन चालले होते. बडोद्यातलं प्रदर्शन हजारो लोकांनी पाहिले. बडोद्याच्या इतिहासात ही पहिलीच वेळ होती की लोकांसाठी चित्रप्रदर्शन खुले ठेवण्यात आले होते.

सगळ्या चित्रांना राजा रवी वर्मांच्या निगराणीखाली दरबारहॉलमध्ये नीटनेटके लावले गेले. याखेरीज राजा रवी वर्मांनी बडोदा वास्तव्यास असताना सन १८९० साली राजकुटुंबापैकी ७ जणाचे तैलचित्र काढले आहेत. यात महाराणी चिमणाबाई (पहिल्या) यांच्या दोन तसबिरी, महाराणीसाहेब (दुसऱ्या) यांच्या दोन पोर्ट्रेट . तसेच जयसिंगराव, युवराज फत्तेसिंगराव आणि संपतराव गायकवाड यांचाही यात समावेश आहे.

पौराणिक विषयावरील अस्सल १४ तैलचित्रांचा संग्रह आहे.

१. श्रीरामचंद्राचा विवाह

२. श्रीकृष्णाची दृष्ट

३. गंगा आणि शंतनू

४. कारागृहातून श्रीकृष्णाला वसुदेव घेऊन निघतो.

५. मत्स्यगंधा

६. विश्वामित्र मेनका

७. कीचक आणि सैरंध्री

८. हरिश्चंद्र तारामतीच्या वधास उद्युक्त झाला आहे.

९. राधा माधव

१०. भरत


११. कंस आणि माया


१२. यतिवेषधारी अर्जुन आणि सुभद्रा

१३. नलदमयंती

१४. द्रौपदी वस्त्रहरण

इतिहासात, आज आणि नंतर कित्येक वर्षे राजा रवी वर्माचा वरील चित्रसंग्रह म्हणजे राष्ट्राचा एक अमूल्य खजिना म्हणून स्मरणात राहणार आहे. खुद्द राजा रवी वर्माच्या हातचा अस्सल चित्रांचा एवढा मोठा संग्रह बडोदा आणि म्हैसूरशिवाय कोणत्याही ठिकाणी उपलब्ध नाही.










Ravi Varma




Ravi Varma.



## राजा रवी वर्माला हृदयस्पर्शी निरोप

राजा रवी वर्मांचे बडोद्यातलं काम संपलं होतं. तरीही महाराजांच्या आग्रहाखातर त्यांचं बडोद्यातलं वास्तव्य वाढलं होतं. राजा रवी वर्मा यांचा निरोप समारंभ ठरला. यासाठी सयाजीरावांनी खास दरबार भरविला होता. नव्या दिवाणांसह, खासे मंडळी आणि सरदार मंडळी त्या दरबारात उपस्थित होती. दरबाराच्या मध्यस्थानी राखीव आसनांवर रवी वर्मा, राज वर्मा स्थानापन्न झाले होते. महाराज सिंहासनावरून उठले आणि म्हणाले, "राजा रवी वर्मा, आमच्या इच्छेनुसार आपण दरबारमहालासाठी जी चित्रे तयार केलीत, ती पाहून आम्ही आनंदी झालो आहोत. आम्हीच नव्हे तर बडोद्यातील जनतेनेही या चित्रांची मनसोक्त स्तुती केली आहे. या चित्रकृतींबद्दल आपल्याला पन्नास हजार रुपये (आजच्या २०२१ च्या सोन्याच्या दरानुसार त्याची किंमत १३ कोटी इतकी होते) कलाधन आणि मानवस्त्र भेट देत आहोत, त्याचा प्रेमाने स्वीकार करावा."

खरंतर दिवाणांनी किंवा खास सचिवांनी करायचं भाषण महाराजा सयाजीरावांनी स्वत:च केलं. राजा रवी वर्मा यांच्या प्रेमापोटी त्यांना त्यावेळेस राहवले गेले नाही आणि त्यांच्या निरोप समारंभाची सूत्रे नकळत त्यांनी स्वत: हातात घेतली. त्यानंतर राजा रवी वर्मा यांना चांदीच्या तबकात सर्व नजराणा भेट दिला गेला. राजा रवी वर्मा यांचे डोळे भरून आले. त्यांनी

शांतपणे नजराणा स्वीकारला. राजा रवी वर्मा आणि राज वर्मा यांना सन्मानाने मानवस्त्र दिली गेली, अत्तर, गुलाब दिले, मानाचे विडे देऊन दरबार संपला.

राजा रवी वर्मांचा बडोद्याहून निघण्याचा दिवस उजाडला होता. सामानाची बांधाबांध चालली होती. राज वर्मा सर्व गोष्टी जातीने ठेवीत होते आणि त्यावेळेस अचानक दरवाजामध्ये खुद्द महाराजा सयाजीराव अवतरले आणि एकच गोंधळ उडाला. राजा रवी वर्मा धोतर आणि पंचा एवढ्याच अंगावरच्या कपड्यावर सामानाची आवराआवर करत होते. कपडे बदलण्याचेही त्यांना सुचले नाही. डोक्यावर पगडी नाही, अंगात सदरा नाही अशा वेशातल्या राजा रवी वर्मा यांना पाहून महाराजांना हसू आले. महालाच्या प्रवेशद्वारातच दोघांची गाठ पडली. रवी वर्मांनी लगेच खांद्यावरचे उपरणे जमिनीवर टाकले. गळ्यातलं जानवं कोपराखाली आणलं आणि नम्र भावानं महाराजांना वंदन केलं. रवी वर्मा मनात पूर्ण गोंधळले होते. महाराज तसे शिस्तप्रिय. वेळेचे महत्त्व जपणारे! प्रत्येक क्षण कामात घालवणारे. मुलाखतीची वेळ ठरल्याशिवाय कुणाचीही भेट न घेणारे. हे महाराजा न सांगता, न कळविता अचानक दारी का आले? या विचारातून भानावर येत असता महाराजांनी रवी वर्मांचं उपरणं जमिनीवर पडल्याच लक्षात आणून दिलं. त्यावर रवी वर्मा म्हणाले, “नाही महाराज, हा आमचा दक्षिणी रिवाज आहे.! जेव्हा गुणी, श्रेष्ठ माणसाचं दर्शन घडतं, तेव्हा आपली मानवस्त्र उतरून आम्ही

त्यांना वंदन करतो. त्यासाठी हा पंचा खाली टाकला आहे आणि जानवं हातावर घेतले आहे.” राजा रवी वर्मा महाराजांपेक्षा १५ वर्षांनी मोठे होते. त्यामुळे महाराज म्हणाले, “आपण आमच्यापेक्षा वयानं मोठे आहात.” त्यावर रवी वर्मा उत्तरले, “वय आणि अधिकार याचं गणित कधीच जुळलं नाही. तरुण शंकराचार्यांच्या पुढे वयोवृध्द वेदपारंगत कुमारिल भट्टांनी नाही का शरणागती स्वीकारली?” यावर सयाजीराव काही बोलले नाहीत. राजा रवी वर्माचा हात आपल्या हातात घेत म्हणाले, “आज आम्ही आमचा रिवाज मोडला. त्याची जाणीव आम्हाला आहे.; पण आज आपण जाणार या कल्पनेन मन बेचैन झाले आहे. आपल्यासारखी माणसं सदैव अवतीभोवती असावीत असे वाटते आम्हाला. आमच्या या राजेशाही जीवनात मुभा असती तर तुम्हाला स्टेशनवर सोडायला आम्ही नक्की आलो असतो. आज आपल्याला निरोप देताना एक भेट आणली आहे. त्याचा स्वीकार करावा.”

दरबाराच्या निरोप समारंभात आधीच भरघोस भेट मिळाल्याने राजा रवी वर्मांना आता कोणतीही भेट सामान्य वाटणे स्वाभाविक होते. त्यामुळे त्यांना महाराजांकडून अधिक काही नको होते; पण महाराजांनी राजा रवी वर्मांसाठी अशी भेट आणली होती की, खुद्द राजा रवी वर्माही ती नाकारू शकत नव्हते. सयाजीरावांनी टाळी वाजवली आणि त्यांचा सेवक हातात तबकं घेऊन हजर झाला. राजा रवी वर्मांनी तबकाकडे पाहत विचारले, ‘काय

आहे?’ महाराजांनी तबकावरचे आवरण उघडण्याची त्यांना विनंती केली. तसे महाराजांची आज्ञा राजा रवी वर्मांनी पाळली. दोन मोठ्या तबकांमध्ये नाना रंगाच्या विंडसर न्यूटन कंपनीच्या रंगाच्या ट्युबा होत्या. त्यात राजा रवी वर्मांच्या आवडत्या रंगाचे नेपल्स यलो, टेरा सोनिया, अल्ट्रा मरिन, गॅमबोग आणि अत्यंत आवडता पर्शियन ब्ल्यू भरपूर प्रमाणात तबकात दिसत होता. तिसऱ्या तबकात वेगवेगळ्या आकाराचे रंगकामाचे ब्रश होते. रवी वर्मा त्या तबकांकडे पाहातच राहिले. महाराजांनी हे सर्व सामान राजा रवी वर्मांसाठी लंडनहून मागविले होते आणि यापुढेही महाराज त्यांना हे सामान मागावून देत जाणार आहेत असे त्यावेळी महाराजांनी त्यांना सांगितले. राजा रवी वर्मा एकदा माधवरावांना म्हणाले होते, “मुंबई-मद्रासमध्ये मिळणारे काही रंग कालांतराने फिके पडतात. ते अस्सल नसतात.”

राजा रवी वर्मांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून गेले होते. इतका जगावेगळा व काळजी करणारा राजा त्यांना आयुष्यात प्रथमच भेटला होता. त्यावेळेस राजा रवी वर्मा नि:शब्द झाले होते. महाराजांनी त्यांच्या भावना ओळखल्या आणि म्हणाले, “आपण वयानं मोठे. काही बोलू नका. आपण चिंता करू नये. आपली भेट परत घडेल. आपला प्रवास सुखाचा होवो. आम्ही येतो.” महाराज निघून गेले. आनंद आणि अशा जगावेगळ्या राजाला सोडून जाण्याचे दु:ख या दुहेरी भावनांच्या खेळात राजा रवी वर्मांना काहीच समजत नव्हते.

ठरल्यावेळी राजा रवी वर्मा यांना स्टेशनवर सोडायला घोडागाडी आली होती. सेवकवर्गासाठी दुसऱ्या गाड्यांची व्यवस्था केली गेली होती. घोडागाडीत बसून स्टेशनवर जाताना त्यांना सतत थोर राजा आठवत होता. स्टेशनच्या प्रवेशद्वारी घोडा गाडी थांबली आणि रवी वर्मा आश्चर्यचकित झाले. खुद्द दिवाणसाहेब त्यांना निरोप देण्यासाठी स्टेशनवर आलेले होते. घोडागाडीतून आगगाडीच्या डब्यापर्यंत तांबड्या रंगाचा गालिचा अंथरला होता. त्यावरून राजा रवी वर्मा राज वर्म्यासह डब्यात गेले तर सारा डबा सुवासिक फुलांनी बहरलेला होता. आधीच भारावलेले रवी वर्मा अशा निरोपाने अजूनच भारावून गेले. असा हृदयस्पर्शी निरोप ते पहिल्यांदाच अनुभवत होते आणि परत एकदा नि:शब्द झाले होते. गाडी निघायची धटिका जवळ आली आणि त्याच वेळी दिवाणांनी एक शाही लखोटा राजा रवी वर्माच्या हातात दिला. आधीच एकावर एक भारावण्याचे प्रसंग घडत होते आणि आता हा लखोटा ! गाडी सुरू झाली होती आणि हळूहळू वेग घेत होती. स्टेशन मागे गेले. रवी वर्मांनी तो शाही लिफाफा उत्सुकतेने फोडला. ज्यात राजचिन्हांकित एक छोटंस पत्र होतं. त्यात लिहिलं होतं...

**Dear Rajaji,**

**You are a prince amongst painter, and painter amongst the prince.**

**Yours loving**

**Sayaji**

हे पत्र वाचून होताच राजा रवी वर्माला अश्रूंना आवरता आले नाही. या थोर राजाच्या प्रेमादराने त्यांच्या दोन्ही डोळ्यांना धारा लागल्या.

## मुंबईत "द रवी वर्मा फाइन आर्ट लिथोग्राफकी प्रेस"

१८९३ ला ते मुंबईला गेले आणि १८९४ ला त्यांनी भारतातली पहिली "द रवी वर्मा फाइन आर्ट लिथोग्राफकी प्रेस" उभारली. यावर पहिली प्रिंट 'शकुंतला जन्म' या पेंटिंगची काढली गेली. भारतात पहिल्यांदा ऑईल पेंटिंग या प्रकारच्या पेंटिंगची सुरुवात राजा रवी वर्मांनीच केली. राजा रवी वर्माने काढलेल्या चित्रांनंतरच हिंदूंना आपले देव कसे दिसत असावेत, ते समजले. भारतातील परंपरागत हिंदू महाकाव्ये आणि पुराणांतील कथा यांवर रविवर्म्यांनी काढलेली चित्रे आजही प्रमाण मानली जातात.

१८९६ नंतर महाराष्ट्रातील राष्ट्रवादाला पाठिंबा देण्यासाठी म्हणून रवी वर्मा यांनी त्यांच्या प्रेसमध्ये राष्ट्रीय नायक, जसे शिवाजी महाराज, टिळक, रानडे यांचे ओलिओग्राफ्स छापले. बडोद्याच्या राजाश्रयानंतर अनेक संस्थानिकांनी राजा रवी वर्मा यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पौराणिक कथांवर आधारित चित्रे रंगविण्याची जबाबदारी सोपवली. यावरून असे लक्षात येते की, बडोद्याचे राजाश्रय आणि सर सर टी.माधवराव यांनी राजा रवी

वर्मांवर दाखविलेला विश्वास हे राजा रवी वर्मांच्या चित्रकलेच्या यशस्वी कार्यकीर्दीतला सुवर्णकाळ मानला पाहिजे.

## कलासक्त महाराजा सयाजीराव गायकवाड

यानंतर १८९० मध्ये महाराजांनी बडोद्यात कलाभवन स्थापन केल्यानंतर त्यात चित्रकलेचा एक वर्ग उघडला. त्यासाठी बुधवारकरांना चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी मुद्दाम युरोपला पाठवून परत आल्यावर याच शाखेचे मुख्याध्यापक म्हणून नेमण्यात आले. बुधवारकरांनी काढलेल्या उत्तम चित्रांचा संग्रह बडोद्यात पाहायला मिळतो.

अशाप्रकारे ललितकलेत चित्रकलेला प्राधान्य देऊन आपल्या राज्यात उन्नती घडवून आणण्याचे प्रयत्न महाराजांनी तन-मन-धन ओतून केले, त्यांना वरील विषयाबद्दलची अभिरुची हेच कारणीभूत झाले. केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीने अशा कलांना उत्तेजन देणे व स्वत:च्या अंत:प्रेरणेने त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे या दोन गोष्टी स्वभावत: भिन्न आहेत. म्हणून या दोन प्रकारांपैकी बेनिन जॉन्सन् ( Ben Johnson ) या कवीने म्हटल्याप्रमाणे-

"The thirst that from soul doth rise,
Doth ask a drink divine."

"अंत:करणाची तृषा शांत करण्यास उपयोगी पडणाऱ्या साहित्यसंगीतादी कला' यांची अभिरुची महाराजांना जात्याच होती, असे दिसून येते.


webneel.com

# संदर्भग्रंथ

१. आपटे दाजी नागेश, (१९३३), साहित्य आणि ललितकला, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, वाढदिवस मंडळ, बडोदे आणि मुंबई.

२. देसाई रणजित, (१९८४), राजा रवी वर्मा, मेहता प्रकाशन, पुणे.

३.मालुंजकर भांड धारा,२०२०,ललितकला, खंड २५, भाग ५, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
 - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
 - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
 - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
 - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
 गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
 - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
 - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
 - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
 - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
 - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
 - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
 कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
 परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
 - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
 जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
 राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com